**MHLA160011572023**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | २९/१२/२०२३. | | |
| नोंदणी दिनांक | : | २९/१२/२०२३. | | |
| निकाल दिनांक | : | ०१/०७/२०२६. | | |
| कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०२ | ०७ | ०२ |
| निशाणी क्र. | : | १० | | |

**भाग 'अ'**

( पॅरा ४४ (i) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

| | | |
|---|---|---|
| | | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवणी यांचे न्यायालयात**<br>**पिठासीन अधिकारी : श.अ. सुरजुसे**<br>**–:: संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२९६/२०२३ ::–** |
| | | **पहिली खबर अहवाल क्र.३५४/२०२३.**<br>**पोलीस ठाणे, देवणी, ता. देवणी, जि. लातूर.** |
| **अभियोग पक्ष** | : | **महाराष्ट्र शासनातर्फे :**<br>पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे,<br>देवणी ता. देवणी जि. लातूर. |
| **अभियोग पक्षाकरिता** | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री. एस.एम. हाशमी. |
| **आरोपी** | : | **जयवंत गोविंद श्रीमंगले,**<br>वय : ४० वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. येणकी, ता. उदगीर, जि. लातूर. |
| **आरोपीतर्फे वकिल** | : | श्री. एस. पी. कांबळे. |

**भाग 'ब'**

( पॅरा ४४ (ii) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २९/११/२०२३. |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २९/११/२०२३. |
| दोषारोप पत्राची तारीख | २९/१२/२०२३. |
| दोषारोप निश्चितीची तारीख | १०/१२/२०२४. |
| सुनावणी प्रारंभ तारीख | १०/१२/२०२४. |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | ०१/०७/२०२६. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०१/०७/२०२६. |

| | |
|---|---|
| शिक्षा झाल्यास, शिक्षा सुनावणीची तारीख | -- |

## आरोपी तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनाची तारीख | अपराध दोषारोप | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ च्या अनुशंगाने सुनावणी दरम्यान न्याय बंदी असण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **जयवंत गोविंद श्रीमंगले** | निरंक | १०/१२/ २०२४ | म.दा.का. कलम ६५(ई) | निर्दोष | निरंक | निरंक |

**टीप –** फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI चे परिच्छेद क्र.४४(iii) प्रमाणे अभियोग पक्षाने सादर केलेले तोंडी आणि लेखी पुरावे हे भाग 'क' मध्ये दाखविलेले असून ते न्यायनिर्णयाच्या शेवटी जोडलेले आहे.

## न्यायनिर्णय

## (दिनांक ०१/०७/२०२६ ला पारीत)

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) च्या गुन्ह्याकरिता खटला आहे.

२. मी उपलब्ध अभिलेख, पुरावा आणि दोन्ही पक्षांचा युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यावरून माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेत आणि मी त्यावर माझे निष्कर्ष आणि कारणमीमांसा खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक २९/११/२०२३ रोजी, १५.३० वाजता येणकी येथे आरोपीकडे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमा | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अंतर्गत प्रतिबंधित दारू बेकायदा विक्री करण्याच्या उद्देशाने मिळाली आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला? | | **नाही.** |
| २. | काय आदेश ? | | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ :-**

३. विद्वान साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. हाशमी आणि बचाव पक्षाचे विद्वान अधिवक्ता श्री. एस. पी. कांबळे यांनी युक्तिवाद समजावा असे सांगितले.

४. मी उपलब्ध अभिलेख आणि पुरावे यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. आरोपीने त्याची उल्लेखीत घटनास्थळावरील हजेरी, मुद्देमालाची जप्ती आणि त्याचा गुन्ह्यातील सहभाग नाकारलेला आहे. अभियोग पक्षाने सदर बाबी स्वतंत्र साक्षीदारांकडून सिध्द करणे आवश्यक आहे.

५. आकाश (अ.सा.क्र.-१) च्या साक्षीप्रमाणे दि.२९/११/२०२३ रोजी येणकी येथील बस थांबा येथे पोलिसांनी त्याच्या सहया घेतल्या आणि पंचनाम्यावर त्याची सही नि.१८ आहे. अभियोग पक्षाने त्याचा उलटतपास घेतला परंतु नमुद घटना किंवा मुदृदेमालाची जप्ती यासंबंधी सबळ साक्ष गोळा केलेली नाही. त्यांनी अभियोग पक्षाला दुजोरा दिलेला नाही.

६. उपरोक्त साक्षीप्रमाणे आरोपीकडून दारू जप्त केलेली नाही. त्याचप्रमाणे कथित घराबाबत सबळ साक्ष आणि कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे सदर घराचा संबंध आरोपीसोबत जुळविणे अयोग्य ठरेल. यथास्थितीत आरोपीकडून मुद्देमालाची जप्ती झाल्याचे पुराव्यानिशी सिध्द झाले नाही. त्यामुळे

पंचनामा ही सदर स्थिती सिध्द करण्यासाठी पुरेशी नाही.

७. येथे नमूद करण्याजोगे आहे की, अभियोग पक्षाने पुरेसा वेळ आणि संधी त्यांचा लाभ घेऊनसुध्दा खबरी व तपास अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यास कसूर केला. त्यामुळे नमूद घटनेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध झाला नाही. नमूद बातमी, कार्यवाही दरम्यान वापरलेल्या वाहनांची ओळख आणि कारवाई या संबंधित ठाणे दैनंदिनीमधील नोंदी कागदोपत्री पुराव्यानिशी सिध्द झालेल्या नाहीत. सदर बाबी ह्या प्रकरणातील उणिवा दर्शवितात.

८. आरोपीने बेकायदेशीररित्या दारू बाळगल्याबाबत सबळ पुरावा उपलब्ध नाही. नमूद घटनेतील आरोपीचा सहभाग संशयास्पद आहे. रासायनिक परीक्षणाचा अहवाल उपलब्ध आहे. परंतु कोणता नमुना, केंव्हा व कोठे पाठविला हे सिध्द झालेले नाही. त्यामुळे फक्त रासायनिक परीक्षणाचा अहवाल किंवा नमुन्यातील मद्य असल्याचा निष्कर्ष हे नमूद गुन्हे सिध्द करण्यासाठी पुरेसे नाही.

९. उपरोक्त चर्चेप्रमाणे, मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो की, नमूद त्रुट्या आणि इतर स्थिती हे अभियोग प्रकरणावर संशय उपस्थित करणारे आहेत. आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या तरतुदींचा भंग करून प्रतिबंधित दारू बाळगल्याचे संशयापार सिध्द झालेले नाही. सबब, नमूद गुन्ह्याची श्रृंखला स्थापित झालेली नाही. मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिले.

**<u>मुद्दा क्रमांक २ –</u>**

१०. उपरोक्त निष्कर्ष आणि कारणमीमांसा याप्रमाणे आरोपी संशयाचा लाभ आणि सबळ पुराव्याच्या अभावी उपरोक्त गुन्ह्यातील निर्दोष होण्यास पात्र आहे. नमूद मुद्देमाल पोलीस ठाणे, देवणी येथे जमा असल्याचे दिसून येते. त्याच्या

विल्हेवाटीकरिता आदेश देता येईल. आरोपीने जामिनाची पूर्तता केलेली नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरामध्ये खालील आदेश पारित आहे.

## आदेश

१) भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८ (१) अन्वये आरोपीला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) च्या गुन्ह्यातून निर्दोष करण्यात येते.

२) आरोपीचे पूर्वीचे जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४९८ प्रमाणे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास नियमाप्रमाणे दारूबंदी अधिकाऱ्यामार्फत जप्त देशी दारूचा मुद्देमाल नष्ट करावा.

४) भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे आरोपीने जामीनाची पुर्तता करावी.

५) न्यायनिर्णय संगणकावर टंकलिखित करून खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.07.01 15:31:46 +0530

**दिनांक :– ०१/०७/२०२६.**
**स्थळ :– देवणी**

**(शरद अ. सुरजुसे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवणी**
**जि. लातूर.**

## परिशिष्ट
**भाग 'क'**

( पॅरा ४४ (i) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायीक साक्षीदार यांची यादी**

**अ.** अभियोग पक्ष–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.१ | आकाश माधव श्रीमंगले | पंच |

**<u>अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायीक कागदपत्रांची निशाणी यादी</u>**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ.नं. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | पंचनाम्यावरील सही | १८ |

**ड. मुद्देमालाचा तपशील.**

| अ.क्र. | वस्तुचिन्हाची निशाणी | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | देशी दारू च्या १३ बॉटल |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.07.01 15:31:54 +0530

**दिनांक :– ०१/०७/२०२६.**
**स्थळ :– देवणी**

**(शरद अ. सुरजुसे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवणी**
**जि. लातूर.**

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करते की, या PDF न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर शब्द न शब्द मूळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) लघुलेखकाचे नाव | : | श्री. एम.एन. येणगे (लघुलेखक श्रेणी–२) |
| २) न्यायालयाचे नाव | : | श्री. शरद अ. सुरजुसे,<br>न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, देवणी,<br>जि. लातूर. |